प्रति,

मा. ______________________________

______________________________

महोदय,

संविधानाच्या कलम ३९(अ) या अंतर्गत मोफत विधी सहाय्यता, समुपदेशन व जागरुकता या बाबत उल्लेख केलेला आहे. समाजात कायद्याविषयी अनभिज्ञता आजही मोठ्या प्रमाणात आहे. त्या करिता जिल्हा, राज्य व राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण व तसेच विधी महाविद्यालय यांची भूमिका मोलाची ठरते. हे उद्दिष्ट लक्षात घेता न.ब. ठाकूर विधी महाविद्यालयाने इतर माध्यमा सोबतच पथनाट्याद्वारे जनजागृती व्हावी या करिता पथनाट्य स्पर्धेचे आयोजन केले आहे. तरी सदरच्या स्पर्धेसाठी आपल्या महाविद्यालयाचा संघ पाठवावा, ही विनंती.

## महाविद्यालयाविषयी थोडक्यात ..........

गोखले एज्युकेशन सोसायटीचे न. ब. ठाकुर विधी महाविद्यालय १९६९ मध्ये विधी साक्षरतेचे पाळेमुळे रुजविली जावी, या उद्देशाने नाशिक येथे प्राचार्य टी.ए. कुलकर्णी यांनी पुढाकार घेऊन स्थापन केले. उत्तर महाराष्ट्रात विधी क्षेत्रामध्ये वाखणण्याजोगे कार्य आमचे महाविद्यालय मागील ५० वर्षांपासून मा. सर डॉ. मो. स. गोसावी सचिव, गोखले एज्युकेशन सोसायटी यांच्या मार्गदर्शनाखाली अविरत करित आहे.

शिक्षण वर्गापुरतेच सीमित न रहाता खऱ्या अर्थाने ज्या समाजास त्याची अत्यावश्यकता आहे व त्यांना ते सुलभ मार्गाने कळावे म्हणून पथनाटाद्वारे कायदेविषयक जनजागृती हा उपक्रम आमच्या महाविद्याल्याने हाती घेतला आहे. सन २०१७-१८ मध्ये १०० पथनाट्याद्धारे विविध कायदे विषयक जनजागृती करण्यात आली व हा उपक्रम आमच्या संस्थेने यथायोग्य राबविण्याचा संकल्प केला, ज्याव्दारे कायदेविषयक जनजागृती तसेच समाजाप्रती बांधिलकी जोपासली जाईल.

# गोखले एज्युकेशन सोसायटीचे

# न. ब. ठाकूर विधी महाविद्यालय, नाशिक

आयोजित

# जिल्हास्तरीय आंतर महाविद्यालयीन

# पथनाट्य स्पर्धा

सन : २०१८-१९

शनिवार, दि. ०५ जानेवारी २०१९ रोजी

सकाळी १० वा.

### ◆ स्पर्धेचे ठिकाण ◆


**न. ब. ठाकूर विधी महाविद्यालय**

प्रिं.टी.ए. कुलकर्णी विद्यानगर,

नाशिक - ४२२ ००५

संपर्क : (०२५३) २५७४१८०

ई-मेल : nbtlawcollege@gmail.com

## -: स्पर्धेचा विषय :-

# पथनाट्याद्वारे सामाजिक व कायदेविषयक जनजागृती

स्पर्धेचे नियम :-

१) या स्पर्धेत नाशिक मधील कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयाचे विद्यार्थी सहभागी होवू शकतात.
२) प्रत्येक महाविद्यालयाचे ५+२ विद्यार्थ्यांचा संघ स्पर्धेसाठी पाठवावा.
३) पथनाट्य हे मराठी किंवा हिंदी भाषेत असावे.
४) सामाजिक व कायदेविषयक विषयांवर जनजागृती यावर आधारित पथनाट्य असावे.
५) पथनाट्य हे १२ ते १५ मिनिटांचे असावे.
६) प्रत्येक संघासाठी २००/- रुपये प्रवेश शुल्क राहील.
७) स्पर्धकांची पुर्ण माहिती महाविद्यालयांच्या प्राचार्यां मार्फत पाठवावी.
८) २४ डिसेंबर २०१८ पूर्वी प्रवेश निश्चित करणे बंधनकारक राहील.
९) स्पर्धे संबंधीचे सर्व हक्क स्पर्धा संयोजक समितीने राखून ठेवले आहेत.
१०) परिक्षकांचा निर्णय अंतिम व बंधनकारक असेल.

## आपले नम्र


प्रा. डॉ. संजय मांडवकर
उपप्राचार्य (मुख्य समन्वयक)
मो : ९८९०३०५३२५

प्रा. डॉ. सौ. अस्मिता वैद्य
प्राचार्या

प्रा. डॉ. भरत कौराणी
समन्वयक
मो : ९४२२७७८८०२

प्रा. वृषाली थोरात
समन्वयक
मो : ९८५००४३६७४


## पारितोषिके

प्रथम पारितोषिक रोख रु. १००१/-
सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र

द्वितीय पारितोषिक रोख रु. ५०१/-
सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र

तृतीय पारितोषिक रोख रु. २५१/-
सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र

उत्कृष्ट विद्यार्थी व विद्यार्थीनी पात्र
प्रत्येकी रोख रु. २५१/-
सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र

## स्पर्धेचे उद्दिष्ट्ये

सामाजिक व कायदेविषयक जनजागृती

समाज प्रबोधन

समुपदेशन

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव

महाविद्यालयांची समाजाप्रती बांधिलकी